ICMR INDIAN COUNCIL OF MEDICAL RESEARCH Serving the nation since 1911

NIIH NATIONAL INSTITUTE OF IMMUNOHAEMATOLOGY

**आईसीएमआर- हीमोग्लोबिनोपॅथी संशोधन व्यवस्थापन आणि नियंत्रण केंद्र**

**(आईसीएमआर- राष्ट्रीय प्रतिरक्षा रुधिर विज्ञान संस्थान)**


मौजा खुटाळा, प्लॉट नं. ९५/१, सर्व्हे नं. ९५/१ & ९२,
चंद्रपूर - ४४२ ४०६ महाराष्ट्र दूरध्वनी : ०७१७२-२६३२३१


# सिकल सेल काय आहे ?

सिकल सेल हा एक अनुवांशिक रक्तविकार आहे. जो आई वडीलांकडून मुलांमध्ये गुणसुत्रांच्या अनुवांशीक स्वरुपात येतो. या आजारामध्ये लाल रक्तपेशींचा आकार ऑक्सीजनच्या कमतरतेमुळे असामान्य व कठोर असा विळ्यांचा आकार किंवा चंद्रकोर आकार धारण करतात. अशा रक्तपेशींची आयुमर्यादा कमी होऊन ॲनिमिया होतो. या आजाराचा कोणताच कायमस्वरुपी इलाज नाही. (अस्थि मज्जा प्रत्यारोपण वगळता (बोन मेरो ट्रांस्प्लांट) परंतु नियमित वैद्यकीय तपासणी व उपायांनी आजारी व्यक्तीचे लक्षण, रोगाची तीव्रता कमी करता येऊ शकते.


## प्रकार

- ✓ सिकल सेल वाहक (AS)
- ✓ सिकल सेल ग्रस्त (SS)




## निदान

- ❖ पुर्ण रक्तकण गणना
- ❖ सोल्युबिलीटी चाचणी
- ❖ सेल्युलोज ॲसीटेट इलेक्ट्रीफोरेसीस
- ❖ एच. पी. एल. सी.
- ❖ डी. एन. ए. तपासणी




## उपचार / नियोजन


- जास्तीत जास्त पाणी प्यावे
- शरीर उबदार ठेवणे
- पौष्टीक आहार घेणे
- पुरेशी विश्रांती
- आवश्यकतेनुसार रक्त चढवणे
- नियमित वैद्यकीय तपासणी व डॉक्टरांच्या सल्यानुसार दररोज फॉलीक ॲसिड, हायड्रॉक्सी युरिया गोळ्या घेणे
- तज्ञांचे मार्गदर्शन घेणे
- अस्थि मज्जा प्रत्यारोपण (बोन मॅरो ट्रांसप्लांट)






## लक्षण

- ✓ रक्ताची कमतरता
- ✓ वारंवार रक्त चढवणे
- ✓ वारंवार कावीळ होणे
- ✓ भूक न लागणे
- ✓ सांधेदुखी हाडे व पोटदुखी
- ✓ कधी कधी अंगावर सुज येणे
- ✓ यकृत आणि प्लीहावर सुज येणे
- ✓ रक्तवाहिण्यामध्ये अडथळा
- ✓ सतत डोळे पिवळसर दिसणे
- ✓ पायाला अल्सर होणे






## संबंधित तज्ञांचे मार्गदर्शन घ्या

- या आजाराचा कोणताच कायमस्वरुपी इलाज नाही.(अस्थि मज्जा प्रत्यारोपण वगळता (बोन मेरो ट्रांस्प्लांट) परंतु नियमित वैद्यकीय तपासणी व उपायांनी आजारी व्यक्तीचे लक्षण, रोगाची तीव्रता कमी करता येऊ शकते.
- लग्नापूर्वी विवाहयोग्य जोडीदाराची सिकल सेल संबधित रक्त तपासणी करणे गरजेचे आहे.(जर एखादी व्यक्ती सिकल सेल वाहक असेल तर त्या व्यक्तीने आपल्या होणाऱ्या जोडीदाराची देखील रक्त तपासणी करणे गरजेचे आहे.)
- गर्भधारणेपूर्वी पती पत्नींची सिकल सेलशी निगडीत रक्त तपासणी करून घ्यावी.
- जर एखाद्या व्यक्तीमध्ये किंवा समुदायामध्ये सिकल सेलचा आजार आढळला असेल तर त्या व्यक्तीच्या कुटुंबातील तसेच त्या विशिष्ट अशा समुदायातील व्यक्तींनी सिकल सेल आजाराची रक्त तपासणी करून घ्यावी.
- पती पत्नी जर सिकल सेल वाहक असतील तर गर्भातच अर्भकाची गर्भजल तपासणी करणे आवश्यक आहे. (११ ते १३ आठवडे सी. व्ही. एस. १४ ते १६ आठवडे एम्नियोसेंथेसिस किंवा १८ ते २० आठवडे कॉर्डोसेंथेसिस करता येते)